# गोव्यातले दिवस

नरेन्द्र चपळगावकर

१९९२ च्या सप्टेंबर महिन्यात एके दिवशी मुख्य न्यायाधीशांनी मला बोलावून 'गोव्याला महिन्याभरासाठी जातोस का' असे विचारले तेव्हा क्षणार्धात मी त्यांना होकारार्थी उत्तर दिले. मुंबई उच्च न्यायालयाचे एक न्यायपीठ गोव्यात होते. गोवा पीठासाठी नेमले गेलेले दोन न्यायाधीश तेथे कायम असत. शिवाय एखादा न्यायाधीश उच्च न्यायालयाच्या इतर न्यायपीठातून तेथे काही दिवसांसाठी पाठवला जाई. गोवा हे माझ्यासाठी केवळ सहलीचे ठिकाण नव्हते. गोमंतकाशी काही भावबंध निर्माण झाले होते. गोव्याच्या मुक्तीसाठी सत्याग्रह आंदोलन सुरू झाले तेव्हा मी विद्यार्थी होतो. गोव्यात सत्याग्रहासाठी आमच्या भागातून जाणाऱ्या तुकड्यांना औरंगाबादेत निरोप दिला जाई. या निरोपसभांत अनेकवेळा मी भाषणे केली होती आणि सत्याग्रहीवर गोळीबार झाल्यानंतर औरंगाबादेत हरताळ पाळून एक मोठी निषेध मिरवणुकही आम्ही काढली होती. पोर्तुगीज काळातले गोवा नभोवाणी केंद्र सकाळी तासभर जुनी मराठी गाणी ऐकवी. लातूरला प्राध्यापक असताना तो एक माझा आवडता कार्यक्रम असे. गाण्याबरोबरच गोव्याची आठवणही रोज होत असे. बा.भ. बोरकर हे माझ्या आवडत्या कवीपैकी एक. गोवा मुक्त झाल्यावर काही वर्षांनी बीडच्या एका महाविद्यालयात बोरकर काव्यवाचनासाठी आले होते. बोरकर आजारी आहेत व एका हॉटेलात उतरले आहेत असा निरोप मिळाल्यानंतर मी जाऊन त्यांना घरी घेऊन आलो. तीन दिवसांच्या सक्तीच्या मुक्कामात त्यांचा स्नेह झाला. त्यांच्या मनमोकळ्या व स्नेहपूर्ण व्यक्तिमत्त्वामुळे तो पुढे वृद्धिंगत होत गेला. बोरकरांनी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढवावी असा आग्रह आम्ही काही मित्रांनी धरला. बोरकरांना निवडून येऊ न देण्याच्या प्रयत्नाचा भाग म्हणून गोमंतक साहित्य सेवक मंडळाच्या सदस्यांचा मताधिकार काढून घेण्यात आला. त्याविरुद्ध खरे म्हणजे गोव्यातील मतदारांनी तक्रार करावयास हवी होती; परंतु तेथे काहीच हालचाल होण्याचा अंदाज दिसेना. तेव्हा मी आणि माझे मित्र सुधीर रसाळ यांनीच एक दावा औरंगाबादच्या न्यायालयात करून गोव्याच्या मतदारांचा अधिकार त्यांना मिळवून दिला होता. ते निवडून येऊ शकले नाहीत; परंतु त्यांचा आमच्यावरील लोभ कायम राहिला. अनेक वेळा त्यांनी गोव्यात येण्याचे निमंत्रण दिले; पण बोरकर हयात असेपर्यंत दुर्दैवाने तो योग आलाच नाही. तोपर्यंत बाकीबाबांच्या कवितेतच मी गोवा पाहिला होता.

गोव्यात तशी माझी प्रत्यक्ष ओळख असलेली एक-दोनच माणसे होती. पहिला म्हणजे माझा जुना मित्र प्रभाकर कळंबकर. अगोदर प्रतिनियुक्तीवर जाऊन नंतर गोव्याच्या सेवेत सामील झालेला प्रभाकर शिक्षण खात्यात अधिकारी होता. मराठवाडा विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक असलेले सदाशिवराव देव गोवा विद्यापीठात आता होते. या दोघाव्यतिरिक्त कोणाचा फारसा प्रत्यक्ष परिचय नव्हता. अर्थात गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्याबद्दलच्या कुतूहलामुळे अनेक स्वातंत्र्यसैनिकांची नावे आणि त्यांनी भोगलेल्या यातनांच्या कथा ऐकून माहीत होत्या. परकीय राजवटीतून मुक्त झालेल्या गोव्याबद्दल आणखी एक ममत्व होते. राजकीय पारतंत्र्याबरोबरच सांस्कृतिक आणि भाषिक पारतंत्र्य भोगलेल्या मराठवाड्यासारखेच गोव्याच्याही जनतेला दुहेरी दु:ख भोगावे लागले होते.

पणजी शहरात आल्तिनो या उंच टेकडीवर वसलेल्या उच्चभ्रू विभागात न्यायाधीशांची निवासस्थाने होती. गोवा स्वतंत्र झाल्यानंतर अस्तित्वात आलेल्या पहिल्या विधानसभेचे सभापती पांडुरंग शिरोडकर ज्या बंगल्यात राहत तो आता मला देण्यात आला होता. बंगला खूप जुना असला तरी प्रशस्त होता.

गोव्याचे ज्युडिशियल कमिशनर ज्या इमारतीत न्यायदान करीत त्यातच उच्च न्यायालय होते. पूर्वीच्या अल्बुकर्क, आताच्या महात्मा गांधी रस्त्यावरची ही इमारत लहान तर होतीच शिवाय ती भरबाजारात होती. न्यायालयात नियमित येणाऱ्या वकिलांची संख्या ४०-४५ असावी. वकिलांना कपडे बदलण्याला अगर काही वाचन करण्यालासुद्धा एखादा मोठा हॉल नव्हता. वकीलवर्ग सर्वसाधारणत: अभ्यासू आणि विनम्र होता. काम मात्र उच्च न्यायालयाच्या इतर न्यायपीठाच्या तुलनेत फार कमी होते. गोव्याचा लहानसा जीव पाहता ते स्वाभाविक होते.

गोव्याचे ॲडव्होकेट जनरल होते जोआकिम डायस. सडपातळ उंच, काळ्या रंगाचे डायस गोव्याच्या स्वातंत्र्यासाठी तरुणपणी मुंबईत चळवळ करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी होते. भाऊसाहेब बांदोडकरांनी हा देशभक्त तरुण हेरला आणि त्याला गोव्याच्या सार्वजनिक जीवनात मानाच्या स्थानावर बसवले. गोव्यातील ख्रिश्चनांची भारतीय मुळे तोडून टाकण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न हाणून पाडणाऱ्या डी कुन्हा यांच्या प्रभावात वाढलेल्या देशभक्त तरुणापैकी डायस एक होते. ते आल्तिनोवरच राहत. त्यांच्या छोट्याशा घरी मी चार-पाच वेळा गेलो असेन. डायसांच्या

पत्नी अर्धांगाच्या विकाराने आजारी होत्या. त्या बिछान्यावरच पडून असत. त्यांच्या घरी गेले म्हणजे पंचाहत्तर वर्षांच्या श्रीमती डायस आपल्या कृश हाताने माझे दोन्ही हात हातात घेऊन आल्याबद्दल आभार मानत आणि अगत्याने चौकशी करीत.

एकदा त्यांनी मला घरी जेवण्याचा आग्रह केला. सुटी असली तरी मला एका महाविद्यालयात काही कार्यक्रमासाठी जावयाचे होते. मी त्या गावी जाणार आहे हे कळाल्याबरोबर श्रीमती डायस मला म्हणाल्या 'जज्ज, तू तिकडे जातो आहेस तर शेजारीच कुंकळीला शांतादुर्गेचे मंदिर आहे. मोठी जागृत देवी आहे. तू तिचे अवश्य दर्शन घेऊन ये.' एक ख्रिस्ती म्हातारी हिंदू देवीचे दर्शन घेण्याचा आग्रह करीत होती हा मला आश्चर्याचा जबरदस्त धक्का होता. माझ्या चेहऱ्यावरील आश्चर्याचे भाव पाहून त्यांनी आणि जोआकिमनी आपल्या सांस्कृतिक आणि भावनिक वारशाची ओळख करून दिली. जोआकिम मला पुन्हा त्यांच्या अंगणात घेऊन गेले. तेथे एक तुळशीवृंदावन होते. बहुसंख्य ख्रिस्ती कुटुंबांच्या घरात एखाद्या उभट ओट्यावर क्रॉस असतो. येथे मात्र तुळशीवृंदावन होते. जोआकिम पती-पत्नी मला सांगत होते की काही शतकांपूर्वी आम्हीही हिंदूच असणार. धर्म बदलला तरी मनात असलेल्या सगळ्याच श्रद्धा नष्ट झाल्या नाहीत. हिंदू आणि ख्रिश्चनांचे सामंजस्य अगदी एकमेकांच्या धर्मश्रद्धा वाटून घेण्यापर्यंत गेलेले मी गोव्यात नंतर पाहिले. हिंदू देवळात ख्रिस्ती मंडळी कौल लावतात, त्यांना त्यासाठी अग्रक्रम दिला जातो. ख्रिस्ती धर्मस्थानाला हिंदू भेटी देतात, तेथे नवस बोलतात, ख्रिस्ती धार्मिक यात्रेत सामील होतात हे दृश्य विशेषत: गोव्याच्या ग्रामीण भागात अजूनही दिसते. नंतरही मी गोव्यात आलो म्हणजे डायस पती-पत्नीना भेटत असे. आज दोघेही हयात नाहीत; पण विकलांग अवस्थेतही स्वागतशील गृहिणीचे अगत्य दर्शवणाऱ्या श्रीमती डायस अजून स्मरणात आहेत.

स्वातंत्र्यानंतर बराचकाळ गोव्याचे ज्युडिशियल कमिशनर म्हणून कुटो यांनी काम पाहिले होते. पोर्तुगीज राजवटीतही ज्यांनी शासकीय सेवा केली होती अशा मंडळीपैकी ते एक. त्यांना भेटावयाची मला उत्सुकता होतीच. मनात रेंगाळणारा भूतकाळ आणि अस्वस्थ करणारा वर्तमानकाळ याबद्दल त्यांची मते जाणून घेण्यात मला स्वारस्य होते. निवृत्त झालेल्या कुटोंच्या घरी तास-दीड तास खूप मनमोकळे बोलणे झाले. गोव्याची प्रतिमा हल्ली मुद्दाम विकृत केली जात आहे अशी कुटोंची तक्रार होती. गोवा हा काही स्वैराचार मान्य असलेल्या लोकांचा प्रदेश नाही; मग त्याविषयी लोकांच्या अशा समजुती का असा त्यांचा प्रश्न होता. त्यांच्या बोलण्यातली वेदना सहज जाणवण्यासारखी होती. युरोपीय संस्कृतीच्या प्रभावातून आलेला मोकळेपणा म्हणजे अनैतिक वागण्याला मान्यता नव्हे हा त्यांचा मुद्दा मलाही मान्य होता. थोड्याच दिवसांपूर्वी एका इंग्रजी साप्ताहिकात गोव्याच्या समुद्र किनाऱ्यावर वाळूत पहुडलेल्या नग्न तरुणीचे चित्र मी पाहिले होते. त्या तरुणीच्या शेजारीच 'गोव्याला भेट द्या' असे सांगणारा फलक छायाचित्रकाराने मुद्दाम चित्रचौकटीत सामील केला होता. अशी चित्रे गोव्याबद्दल गैरसमज पसरवतात हे मी त्यांना सांगितले. गोवा हा मद्य पिण्यासाठी निर्माण झालेला प्रदेश आहे अशीही एक प्रतिमा महाराष्ट्रात कडक दारूबंदी असताना होती. गोवा शासनाने गोव्याच्या सरहद्दीपासून केवळ २०-२५ फुटांवर दारूची दुकाने उघडण्याला संमती दिली होती. महाराष्ट्र किंवा कर्नाटकची सीमा ओलांडली की गोव्याचे दिसणारे पहिले दृश्य म्हणजे दारूची दुकाने. या असल्या गोष्टी गोव्याची प्रतिमा बिघडवण्याला कसा हातभार लावतात याविषयी आम्ही बोललो. गोव्यात अनेक कुटुंबात मद्य उघडपणे घेतले जात असले तरी झिंगलेला माणूस पूर्वी गोव्यात दिसत नसे. गोव्यातल्या ख्रिस्ती समाजात मद्याला एक प्रतिष्ठित व संयमित स्थान होते.

कुटोंना मी सांगितले नाही पण मला आठवण झाली ती लक्ष्मणराव सरदेसाईंच्या काही कथांची. भाविणीवर लिहिलेल्या त्यांच्या कथा वाचणाऱ्या काही गाभुळ्या मंडळींचा गोव्यात गेल्यास आपल्याला सर्वत्र भाविणी दिसतील आणि कदाचित त्या आपलीच वाट पाहत असतील असा समज होता. दोष लक्ष्मणरावांचा नव्हता, अशा वाचकांचा होता.

त्यावेळच्या गोवा सरकारने मराठी आणि कोकणी या दोन्ही भाषिकांना संस्थात्मक पातळीवर राजाश्रय देण्याचे धोरण ठेवले होते. गोव्यात एक मराठी अकादमी व एक कोकणी अकादमी काम करत होत्या. ब्रॅगांझा इन्स्टिट्यूटसारख्या सांस्कृतिक संघटनेत दोन्हींचे प्रतिनिधी होते. भाषा आणि साहित्य याबद्दलच्या माझ्या आस्थेची माहिती गोव्यातील मंडळींना होती. शशिकांत नार्वेकर आणि जयसिंगराव राणे हे मराठी अकादमीचे कार्यकर्ते मला भेटावयास आले. त्यांनी अकादमीच्या कामाची माहिती दिली. नंतर काही दिवसांनी चंद्रकांत केणी व उदय भेंब्रे हे कोकणी पुरस्कर्ते मला भेटून गेले. त्यांनी कोकणीचे गोव्यातील तत्कालीन स्थान व कोकणी अकादमीचे काम याची माहिती मला दिली. कोकणी लेखक जर एकत्र जमले तर त्यांना भेटणे तुम्हाला आवडेल का असे त्यांनी मला विचारले. मराठीच्या पुरस्कर्त्यांचे म्हणणे मला माहीत होतेच, कोकणी लेखकांच्या आणि त्या भाषेच्या पुरस्कर्त्यांच्या भावना जाणून घेण्याची संधी मिळाली तर मला हवीच होती. मी होकार दिल्यानंतर नंतरच्या रविवारी मडगावला एका जेवणाच्या निमित्ताने कोकणी लेखकांना त्यांनी एकत्र केले. दामोदर मावजो, फर्नांडिस अशा अनेक कोकणी लेखकांना मला भेटता आले व त्यांच्याशी मोकळेपणाने बोलता आले.

गोव्याच्या स्वातंत्र्यापूर्वी गोव्याबाहेर राहणारे काही प्रतिभावंत

तरुण काकासाहेब कालेलकरांच्या सान्निध्यात आले. रवींद्र केळेकर, चंद्रकांत केणी अशा अनेकांवर त्या काळात निसर्ग आणि माणूस यांचे नाते शोधणाऱ्या कालेलकरांच्या रसिक वृत्तीचे जसे संस्कार झाले तसेच कोकणीबद्दलची आत्मियताही फुलली असणार.

गोवा मुक्तिनंतर गोव्याची राजभाषा कोकणी व्हावी असा आग्रह कोकणी पुरस्कर्त्यांनी धरला. कोकणी राजभाषा करावयाची असेल तर तिच्या संसाराची मांडामांड पुन्हा एकदा चांगली करावी लागेल याची जाणीव केणी- भेंब्रे आदी कार्यकर्त्यांना होती. कोकणीत अधिक लेखन व्हावे, शब्दकोश, ज्ञानकोश कोकणीतही तयार व्हावेत असा प्रयत्न सुरू झाला. अडचणीचा भाग एवढाच आहे की कोकणी वाचणारा मोठा वर्ग अस्तित्वात आल्याशिवाय कोकणी पुस्तके मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होणार नाहीत.

मराठीचा वापर गोव्यात शिक्षण, धार्मिक कार्यक्रम, नाटक भजनासारखे सांस्कृतिक कार्यक्रम यात निरपवादपणे पूर्वीपासून होतो. घरात मात्र बहुतेक कुटुंबात कोकणी बोलले जात. महिन्याभरानंतर मी परत जायला निघालो तेव्हा वकील संघाने आयोजित केलेल्या निरोपाच्या भोजनसमारंभात गोव्यातील एक वकील गुरूदत्त भोबे मला म्हणाले, ''आम्ही बायकोशी प्रेमालाप कोकणीत करतो आणि तिला पत्र मात्र मराठीत लिहितो.''

गोव्याची राजभाषा कोणती असावी या वादाच्या निमित्ताने मराठी व कोकणी भाषिकांत थोडा दुरावा निर्माण झाला. मराठी आणि कोकणी दोन्ही लेखकांना एकत्र आणावे आणि त्यांच्यात संवाद निर्माण करावा असा एक प्रयत्न करण्याचे मी ठरवले. माझ्या निवासस्थानी एका सुटीच्या दिवशी भोजन समारंभ आयोजित करून त्याला निवडक लेखकांना आणि कलावंतांनाही बोलावले. पांडुरंगराव शिरोडकर यांच्यासारखे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, प्रसाद सावकार आणि मलबाराव देसाईसारखे कलावंत आणि रसिक, मनोहर हिरबा सरदेसाई, नार्वेकर आणि केणी, भेंब्रे यांच्यासारखे मराठी आणि कोकणी लेखक असे सुमारे ३०-४० लोक हजर होते. गोव्यात एकमेकांकडे सहज गप्पा मारायला जाण्याची प्रथा फारशी नाही. त्यातही गेल्या काही दिवसातील वातावरणामुळे मराठी व कोकणी लेखक एकत्र जमण्याचा योग कठीण. माझ्या घरच्या भोजन समारंभात हा योग जुळून येत होता. मराठी आणि कोकणी दोन्हींचे नातेच असे आहे की ते तोडायचे म्हटले तरी तुटणे अवघड. एकमेकांशी जवळीक राखण्यात, एकमेकांकडून घेणे-देणे चालू ठेवण्यात दोघींचेही हित आहे हे कोणालाही सहज लक्षात येण्यासारखे आहे. कोकणी जर समृद्ध व्हावयाची असेल तर त्यासाठी मराठीची सर्वात जास्त मदत होईल व कोकणी ही मराठीची बोलीभाषा असल्याचे आपण मानत असू तर कोकणीची समृद्धी ही एकापरीने मराठीची समृद्धी मानली पाहिजे असा माझा युक्तिवाद असे. परस्पराविषयी कटुता बाळगण्याऐवजी एकमेकांचे संबंध स्नेहाच्या, सहकार्याच्या पायावर उभे राहावेत हे श्रेयस्कर होते व त्या प्रयत्नाला हातभार लावण्याचा माझाही मानस होता. कोकणी आणि मराठी दोन्हींचाही वापर शासनाने केला आणि दोघांनाही योग्य दर्जा देण्याचे आश्वासन पाळले तर वादाचे कारण बऱ्याचअंशी नाहीसे होऊ शकते. भोजनाच्या वेळी दिलखुलास चर्चा झाली. प्रसाद सावकार म्हणाले, 'असे आम्ही एकत्र फार कमी वेळा येतो, त्यामुळे आजचा योग चांगला होता.'

सामान्यत: दसऱ्याच्या दिवशी मी बाहेरगावी जात नाही. यंदाचा दसरा मात्र गोव्यात होणार होता. दसऱ्याच्या दिवशी अगर दुसऱ्या दिवशी वडील माणसांना भेटून त्यांचे आशीर्वाद घेण्याची प्रथा आहे. नेहमी दसऱ्याच्या दिवशी ज्यांच्याकडे जात असे ते तर दूर होते. माझे वडील स्वातंत्र्य चळवळीत असल्यामुळे स्वातंत्र्यसैनिकाबद्दल आत्मियता होती. गोवा मुक्तिआंदोलनातील वयाने ज्येष्ठ असलेल्या एक-दोघांना दसऱ्यानिमित्त भेटावयाचे असे मी ठरवले. पांडुरंग शिरोडकर आणि पांडुरंग मुळगावकर या दोघांच्या घरी मी गेलो व त्यांच्या शुभेच्छा घेतल्या.

गोव्यात पूर्वी गुन्हेगारी फार कमी होती. पंधरा-वीस वर्षांत एखादाच खून किंवा बलात्कारासारखा गंभीर गुन्हा होई. पोर्तुगीज कायद्यानुसार पोलिसांसमोरील जबानीही पुराव्यात दाखल करून घेतली जाऊ शके. शिवाय पोलिसांचा दराराही जबरदस्त होता. रात्री अकरा वाजताही स्त्रिया निर्भयपणे रस्त्यावर फिरू शकत असे वातावरण स्वातंत्र्यानंतर काही काळ होते. माझ्यासमोर जामीनासाठी आलेल्या एका अर्जामुळे गोवा कसे बदलत आहे याची चुणूक पाहवयास मिळाली. मांडवी नदीवरचा पूल नव्यानेच बांधला गेला होता. त्यावर अद्याप प्रकाशाची व्यवस्था झाली नव्हती. अंधाराचा फायदा घेऊन पुलावर गाड्या अडवून वाटमारी सुरू झाली. त्यातील आरोपीचा जामीनअर्ज माझ्यासमोर आला होता. गोव्यात वाढू पाहणाऱ्या गुन्हेगारीला वेळीच आळा बसणे आवश्यक होते. गुन्ह्याचे स्वरूप पाहून मी जामीनाचा अर्ज फेटाळला.

थोड्यादिवसानंतर आणखी एक गोष्ट लक्षात आली. सत्र न्यायालयासमोरील सुनावणी एकदा सुरू झाली म्हणजे निकाल जाहीर झाल्यावरच ती थांबली पाहिजे अशी कायद्यातच तरतूद आहे. एक जामीन अर्ज सुनावणीसाठी माझ्यासमोर आला. खटला सुरू होण्याला किती दिवस लागतील असा प्रश्न मी वकिलांना विचारला असता खटला पूर्वीच सुरू झाला आहे असे त्यांनी उत्तर दिले. जर खटला चालू असेल तर आता जामीन कशाला, चार-आठ दिवसांत निकालच लागेल असे मी म्हणालो. त्यावर एक साक्षीदार तपासून दुसऱ्या साक्षीदारासाठी दोन महिन्यानंतरची तारीख देण्यात आली आहे असे मला सांगण्यात आले. ही फारच आश्चर्याची गोष्ट होती. वकिलांच्या सोयीप्रमाणे किंवा अन्य कारणाने सत्र न्यायालयासमोरील सुनावणी महिन्या महिन्याच्या तारखा वाढवत चालली तर त्याला 'सत्र'

(Sessions) म्हणण्याचे काही कारणच उरणार नाही. मी अशा खटल्यांची माहिती गोव्यातील दोन्ही सत्र न्यायालयाकडून मागवली तेव्हा मला सांगण्यात आलेली माहिती बरोबर आहे असे दिसून आले. शेवटी मी जामीन दिला नाही; मात्र त्याचबरोबर सत्र न्यायालयांनी अशा पद्धतीने लांबच्या तारखा देऊ नयेत व रोजच्या रोज खंड न पाडता त्या खटल्याचे काम चालवून निकाल द्यावा असा कायद्यातील तरतुदींची आठवण देणारा आदेश दिला.

न्या. द सिल्व्हा हे उच्च न्यायालयातील माझे सहकारी न्यायाधीश. त्यांच्या घरी येण्याचे निमंत्रण त्यांनी मला एकदा दिले. सिल्व्हा मडगावात राहत. मडगावात मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या सर्वात मोठ्या चर्चजवळ माझे घर आहे असे सिल्व्हांनी मला खुणेसाठी सांगितले होते. मडगावात पोहोचल्यानंतर ते चर्च तर सहजच सापडले. तेथे मी सिल्व्हांच्या घराची एका माणसाजवळ चौकशी केली. गृहस्थ भलताच बोलका निघाला. घर दाखवायला स्वत:च येण्याची त्याने तयारी दर्शविली व सिल्व्हाचे घर येईपर्यंत मी न मागितलेली बरीच माहिती त्याने आपणहून सांगितली. तो म्हणाला, ''मी या चर्चजवळच राहतो. कारण चर्चच्या जागेत पूर्वी देऊळ होते. त्या देवळाचे पुजारीपण आमच्या घराण्यात होते. आम्ही नंतर ख्रिस्ती झालो; पण आम्ही ब्राह्मण ख्रिस्ती आहोत, इतर जातीबरोबर आमचे लग्नसंबंध होत नाहीत'' ही माहिती तो मोठ्या अभिमानाने देत होता. धर्म बदलला तरी जात कशी चिकटून राहते याचे आणखी एक उदाहरण मी पाहत होतो.

सिल्व्हांचे घर ही पोर्तुगीज अमदानीतील सरंजामदारी वैभवाच्या खुणा सांगणारी वास्तू होती. घर तर प्रेक्षणीय होतेच शिवाय सिल्व्हा पती-पत्नींनी काही अतिशय दुर्मिळ वस्तूही घरात संग्रहित केल्या होत्या. असेच एक घर टाईम्समध्ये दीर्घकाळ असलेल्या चित्रकार मारिओ मिरांडा यांचेही आहे. पण ते पाहण्याचे मात्र राहून गेले.

गोव्यात एकदा ऐन पावसाळ्यात जवळजवळ दीड-पावणेदोन महिन्यासाठी मला पाठवण्यात आले होते. सामान्यत: त्या काळात गोव्यात यायला बाहेरची मंडळी नाखुश असतात. धो-धो पाऊस पडत असतो आणि ज्यांना गोव्यातील प्रेक्षणीय स्थळेच मुख्यत: पाहावयाची आहेत त्यांना त्या काळात येऊन उपयोग नसतो. मला मात्र पाऊसच पाहण्यासाठी गोव्यात येणे आवडले. मराठवाड्यात अगदीच थोडा पडणारा पाऊस गेल्या काही वर्षांत आणखी कमी कमी होत चालला आहे. त्यामुळे माझ्यासारख्याला पाहायला पावसापेक्षा दुसरे अधिक चांगले काय असणार? सतत आठ-दहा दिवस जोरदार पाऊस कोसळत होता. मी माझ्या पत्नीला आणि मुलांना मुद्दाम बोलावून घेतले आणि त्या ऋतुचा आनंद घेतला.

गोव्यातला माणूस सामान्यत: जाहीरसभातील भाषणे ऐकायला यायला नाखुश असतो. गोव्यात होणाऱ्या सभांना साठ-सत्तर माणसे जमली म्हणजे बऱ्यापैकी उपस्थिती होती असे म्हणण्याचा प्रघात आहे. आता तर सगळीकडेच सभांना येणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे. नीरस भाषणापेक्षा अधिक चांगल्या गोष्टीत वेळ घालवावा असे जर गोव्यातल्या माणसाला वाटले तर त्याबद्दल त्याला दोष देणे बरोबर नाही. शिवाय वेगवेगळ्या ठिकाणी विखुरलेले लोक सभेसाठी दूरपर्यंत येणेसुद्धा कठीण होते. गोव्यातली वस्ती किनारपट्टीवरच्या सगळ्याच भागाप्रमाणे विखुरलेली आहे. देशावरच्यासारखी अगदी दाट लोकवस्ती नाही. त्यामुळेही गर्दी जमणे हे गोव्यात कठीण असावे.

गोमंतकला खरा रस आहे तो संगीत आणि संस्कृती यात. गुरूपौर्णिमेनिमित्त एका संगीत शिक्षकाने आयोजित केलेल्या कार्यक्रमाला मी थोडावेळ हजर होतो. बुवांचे दोनअडीचशे छोटे शिष्य तेथे जमले होते. आज तर गोवा विद्यापीठाचा संगीत विभागही काम करतो आहे. गोव्याने अनेक श्रेष्ठ संगीतकार दिले आणि ते कोठेही स्थायिक झाले असले तरी आपल्या ग्रामदेवतेसमोर हजेरी लावण्यासाठी नियमाने येतात. विविध देवळात होणारे पारंपरिक उत्सव पाहण्यासारखे असतात. एकदा उत्सवांच्या काळात मी गोव्यात होतो. कोणतीही पूर्वसूचना न देता जाऊन, सामान्य माणसाप्रमाणेच गर्दीत उभे राहून हे उत्सव मी पाहिले. देवाची पालखी, त्यापुढे पारंपारिक पद्धतीने घोषणा देत चाललेला पुजारी, देवळाच्या आवारातल्याच कोपऱ्याकोपऱ्यात भाविणीने म्हटलेली पदे हे सर्व भावोत्कटतेचा प्रत्यय आणून देणारे होते.

गोव्यातील कनिष्ठ न्यायालयात न्यायाधीशपदासाठी निवड करण्याच्या कामात एकदा मी सहभागी होतो. कोकणी आणि मराठी यांना समान दर्जा देण्याच्या पूर्वीच्या धोरणाप्रमाणे न्यायाधीशपदी नेमले जाण्यासाठी कोकणी किंवा मराठी यापैकी एक भाषा येणे आवश्यक होते. हल्ली हा नियम काढून टाकला आहे, असे मी ऐकतो. साक्षीदार कोकणीत किंवा मराठीत बोलणार आणि गोव्याची राजभाषा देवनागरी लिपीतील कोकणी असल्यामुळे कोकणी जबानी देवनागरीत लिहून घेता आली पाहिजे अशी अपेक्षा ठेवणे स्वाभाविक होते. गोव्यातील लोकसंख्येपैकी ख्रिस्ती मंडळींची संख्या लक्षणीय आहे. न्यायाधीश नेमताना समाजाच्या सर्वच वर्गाप्रमाणे पात्र ख्रिस्ती तरुणांनाही निवडण्याची आमची इच्छा होतीच. बहुतेक सर्व ख्रिस्ती उमेदवारांनी आपल्याला कोकणी येते असे सांगितले होते. प्रत्यक्षामध्ये आपले स्वत:चे नावसुद्धा देवनागरी लिपीत लिहिता येणे बऱ्याच उमेदवारांना कठीण गेले. न्यायाधीशाला साक्षीदाराची जबानी समजली पाहिजे व ती शासनाला मान्य असलेल्या लिपीमध्ये लिहून घेता आली पाहिजे. फौजदारी खटल्यात पोलिसांसमोर जी जबानी झाली ती न्यायालयातल्या जबानीपेक्षा वेगळी असेल तर तो फरक सिद्ध करता येतो. ज्यांना कोकणी येत नव्हते अशा पोलिस अधिकाऱ्यांनी आपल्यासमोर झालेल्या जबान्या चक्क इंग्रजीत लिहून घेतलेल्या असत. साक्षीदार चौकशीच्या वेळी पोलिस ठाण्यात निश्चित काय बोलला हे इंग्रजी जबानीवरून कसे ठरवणार?

गोव्यातील ऐतिहासिक अग्वाद किल्ल्यात गोव्याचा तुरुंग आहे. नानासाहेब गोऱ्यांसारखे अनेक स्वातंत्र्यसैनिक या तुरुंगात होते त्यामुळे त्याला चांगलीच प्रसिद्धी मिळाली आहे. हा तुरुंग पाहण्यासाठी मी गेलो असताना अपुऱ्या जागेत अधिक कैदी एकेका खोलीत ठेवण्यात आले आहेत असे मी पाहिले. काही दिवसानंतर राज्यपाल जेकब यांच्याकडे राजभवनावर भोजन समारंभाला गेलो असताना मी ही गोष्ट त्यांच्या कानावर घातली. नवा तुरुंग बांधण्याचे काम चालू आहे, असे मला नंतर सांगण्यात आले. अग्वादच्या तुरुंगात एक विशेष असा होता की परकीय कैद्यांची संख्या मोठी होती. बहुतेकांना मादक पदार्थ बेकायदेशीररीत्या जवळ ठेवण्यासाठी दीर्घमुदतीच्या शिक्षा झालेल्या होत्या. असे कैदी ज्या तुरुंगात आहेत तेथे अधिक चांगली व्यवस्था होणे आवश्यक असते. अग्वाद तुरुंगापासून काही यार्डांच्या अंतरावर एक पंचतारांकित हॉटेल आहे. जीवनमानाची दोन परस्परविरोधी टोके जवळजवळ नांदत आहेत.

गोव्यातले अनेक लग्नसमारंभ देवळात साजरे होतात. अशा समारंभातले जेवण अतिशय चवदार असते. फक्त हल्ली या जेवणात ब्रेड आणि थंडपेये यांचा शिरकाव झाला आहे. गोव्यात मासे न खाणारांची संख्या फारच थोडी; त्यामुळे नाही म्हटले तरी शुद्ध शाकाहारी जेवणाला महत्त्व कमी. माझ्या बंगल्यातील आचारीही 'बाजार' न चालणारा माझ्यासारखा पाहुणा आल्यामुळे थोडा नाराजच होता. माझे व्याही मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष (भाई) आणि माझा जावई निरंजन हे गोव्यात आल्यावर मात्र त्याच्या पाककौशल्याला बहर आला. शरश्चंद्र पानसे आणि त्यांच्या पत्नी नयना हे दोघे स्टेट बँकेत अधिकारी म्हणून गोव्यात काम करत होते. दोघेही शाकाहारी. त्यांचा परिचय झाल्यावर आम्ही खिचडी देणारा एक गुजराती शोधून काढला आणि त्याचा आश्रय घेऊ लागलो.

भाई आल्यावर त्यांनी सीताकांत लाड यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली. आकाशवाणीबद्दलच्या अनेक ललित लेखात मी लाडांचे नाव वाचलेले होते. ते गोव्यात आहेत याचा मला पत्ताच नव्हता. घर शोधून भाईंच्याबरोबर मी गेलो. सीताकांत खूपच थकलेले होते. भाई भेटल्यामुळे त्यांना आनंद झाला. सीताकांतांचे वडील गणपतराव हे उत्तम पोर्ट्रेट चित्रकार होते. लाडांनी जपून ठेवलेली गणपतरावांची अनेक चित्रे दाखवली. त्यात बालगंधर्वांचेही प्रसिद्ध चित्र होते. असेच एकदा ग्रामोपाध्यांना भेटावयास गेलो. वा.लं.च्यामुळे त्यांचा परिचय पूर्वी झालाच होता.

एकदा मलेरियाचा प्रादुर्भाव गोव्यात झाला आणि त्याने गंभीर रूप धारण केले. सेरेब्रल मलेरिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकाराने दोन रुग्णांचा मृत्यू झाला. न्यायालयात पोहोचल्यानंतर प्रबंधकांनी माझे सहकारी न्यायाधीश न्या. आर.एम.एस. खांडेपारकर यांनी लिहिलेले एक टिपण दाखवले. मलेरियामुळे झालेल्या मृत्यूची स्वत:हून दखल आपण घ्यावी व या प्रकरणी शासनाला नोटीस काढावी अशी त्यांची सूचना होती. मलेरियाची बातमी मी वृत्तपत्रात सकाळी वाचली होतीच. मी त्यांना बोलावून घेतले आणि न्यायालय सुरू होताच या बातमीची दखल घेऊन शासनातील संबंधित अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्याचा आदेश आम्ही उभयतांनी दिला. प्रकरण लगेच तिसऱ्या दिवशी ठेवले.

मलेरिया हा एक घातक रोग आहे हे लक्षात घेऊन ज्या वेगाने शासनयंत्रणा हलावयास हवी होती तशी न हलल्यामुळे आम्हाला हस्तक्षेप करावा लागला होता. शासनाच्या आरोग्य सचिव हजर झाल्यानंतरही फार लवकर काही होत नाही असे दिसल्यावर गोव्यातील सर्व नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांची आमच्या दालनातच आम्ही बैठक बोलावली. अशावेळी फवारावयाची जंतुनाशक पावडर कोणाकडे गरजेपेक्षा जास्त तर कोणाकडे अजिबातच नव्हती. त्याची व्यवस्थित वाटणी आम्ही करावयास लावली. फवारणीचा अहवाल दर दोन-तीन दिवसांनी द्यावयास सांगितले.

मलेरिया कोठून आला व कसा वाढतो याची थोडी चौकशी केली असता असे दिसले की गोव्यात सुरू असलेल्या बांधकामावर आंध्र प्रदेशातून मजूर आले आहेत व त्यातील काहींना मलेरियाची लागण झाली आहे. बांधकामासाठी पाणी साचवण्यासाठी हौद बांधले जातात. या हौदावर झाकण नसते. त्यात डासांची निपज मोठ्या प्रमाणात होते आहे. बांधकामावर आलेल्या सर्व मजुरांच्या रक्ताची तपासणी करावी, त्यांना मलेरिया प्रतिबंधक औषधे द्यावीत, ज्यांना गरज आहे त्यांना दवाखान्यात दाखल करावे व सर्व मजुरांना औषधोपचाराची नोंद करणारी कार्डे द्यावीत अशा विस्तृत सूचना तर आम्ही दिल्याच; शिवाय त्याची अंमलबजावणी करून घेतली. न्या. खांडेपारकर हे गोव्यातलेच रहिवासी असल्यामुळे यंत्रणेला कार्यप्रवण करण्यासाठी काय करावे लागेल याची त्यांना यथास्थित माहिती होती. काही दिवस आम्ही दोघेही मलेरिया नियंत्रक म्हणूनच जणू काम करीत होतो. थोड्याच दिवसात मलेरियाची साथ आटोक्यात आली. शासनयंत्रणेला आपले कर्तव्य करावयास उच्च न्यायालय कसे भाग पाडू शकते याचा एक वस्तुपाठ आम्ही गिरविला होता.

न्यायाधीश म्हणून गोव्यात थोड्या थोड्या काळासाठी तीन वेळा गेलो. निवृत्तिनंतरसुद्धा गोव्यातील स्नेह्यांच्या निमंत्रणामुळे तीन-चार वेळा गेलो. अनेक कर्तबगार आणि स्नेहशील मित्र जोडले गेले. राजकारणातल्या लोकांचे परिचय झाले; पण स्नेह झाला तो लेखकांचा. चंद्रकांत केणींसारखा एखादा मित्र आपल्या जुन्या आठवणी खोल गेलेल्या आवाजात सांगतो तेव्हा भूतकाळाचे काही धागे मनाभोवती वस्त्र विणू लागतात. शशिकांत नार्वेकरांची तळमळ पुन्हा आठवते. राजकारणाने वाढवलेल्या वादाचे ओरखडे पुसट होतात आणि शंकर रामाणी आणि बोरकरांनी ऐकवलेल्या मराठी आणि कोकणी कवितांचे स्वर पुन्हा मनात जागे होतात.